**जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना**
**पुनर्विनियोजन करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे**
**व सुधारित कार्यपध्दती**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक -बीयुडी- २०११/प्र.क्र.३०२/का.६**
**मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक : ५ डिसेंबर,२०११**

वाचा :- १) आ.वि.वि.शा.नि.क्र.आऊयो-१०९१/प्र.क्र.११/का.६, दि.२१ सप्टेंबर,१९९२
२) नियोजन विभाग, शा.नि.क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४, दि.१६.२.२००८ व शासन शुध्दीपत्रक समक्रमांक दि. १६ जून,२००८
३) आ.वि.वि.शा.नि.क्र.टिएसपी-२००८/प्र.क्र.६/का.६, दि.१६ डिसेंबर२००९

प्रस्तावना :- आदिवासी उपयोजना तयार करण्याची जबाबदारी दिनांक २१ सप्टेंबर १९९२ च्या शासन निर्णयान्वये सन १९९३-९४ पासून आदिवासी विकास विभागावर सोपविण्यात आलेली होती. त्यानुसार आदिवासी उपयोजनेचे नियोजन विषयक सर्व कामकाज निधी उपलब्ध करुन देणे, निधी अर्थसंकल्पित करणे त्याचे वितरण करणे हे काम आदिवासी विकास विभागाकडून हाताळण्यात येते.

नियोजन विभागाने दिनांक १६.२.२००८ या शासन निर्णयान्वये सर्वसाधारण योजनेच्या निधी अर्थसंकल्पित करण्याच्या कामकाज पध्दतीत बदल करुन त्याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा नियोजन समितीस प्रदान केलेले आहेत. त्याच धर्तीवर आदिवासी उपयोजनेच्या सध्याच्या निधी अर्थसंकल्पित करण्याच्या कार्यपध्दतीत बदल करण्याचा निर्णय दिनांक ३.६.२००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला व त्यानुसार आदिवासी उपयोजनेचा जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पित करुन वितरीत करणे व त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन यापुढे आदिवासी उपयोजनेखालील जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पित करणे, तरतूदीचे वितरण व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे इत्यादीबाबत सुधारित कार्यपध्दती दिनांक १६ डिसेंबर २००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.तथापि जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेतंर्गत पुनर्विनियोजन मार्गदर्शक तत्वे व त्याबाबतची कार्यपध्दती विशद करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- आदिवासी उपयोजनेतंर्गत जिल्हा वार्षिक योजनेखाली उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून होणाऱ्या बचतीचे पुनर्विनियोजन करण्याच्या पुढील कार्यपध्दतीस शासन मान्यता देत आहे.

जिल्हा योजनांची विभागणी गाभा क्षेत्र व बिगर गाभा क्षेत्रात या दोन गटांमध्ये करण्यात येत असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| विकासशीर्ष /उपशीर्ष (गाभा क्षेत्र) | विकासशीर्ष /उपशीर्ष ( बिगर गाभा क्षेत्र) |
|---|---|
| १) मागासवर्गीयांचे कल्याण | १) क्रिडा व युवक कल्याण |
| २) कृषि व संलग्न सेवा ( पीकसंवर्धन, फलोत्पादन, मृद व जलसंधारण, पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्यव्यवसाय,वने, सहकार) | २) सार्वजनिक आरोग्य सेवा |
| ३) वाहतुक व दळणवळण (जिल्हा रस्ते) | ३) ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता |
| ४) महिला व बालकल्याण, पोषण, अंगणवाडी बांधकाम | ४) विद्युत विकास (ग्रामीण विद्युतीकरण, अपारंपारिक ऊर्जा) |
| ५) सामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण | ५) ग्रामीण विकास ( स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, अवर्षण प्रवण कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, सामुहिक विकास, ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम) |
| ६) लघु पाटबंधारे | ६) माहिती व प्रसिध्दी |
| | ७) वन पर्यटन |
| | ८) इतर उपविकास क्षेत्र ( उदा.नगर विकास ) |

आदिवासी उपयोजनेखाली जिल्हा योजनामध्ये होणाऱ्या बचतीचे पुर्नविनियोजन वर नमूद केलेल्या विकासशिर्ष /उपशिर्षाच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे करता येईल.

१) गाभा क्षेत्रातून फक्त गाभा क्षेत्राकडे
२) बिगर गाभा क्षेत्रातील बचत कोणत्याही कार्यक्रमावर वळविता येईल.
३) आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी (टिएसपी) करण्यात आलेली तरतूद आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी (ओटीएसपी) उपलब्ध करुन देता येणार नाही.तथापि,आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी (ओटिएसपी) करण्यात आलेली तरतूद आदिवासी उपयोजना क्षेत्राकरिता (टिएसपी) उपलब्ध करुन देता येईल.
४) वेतन या बाबीसाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेली तरतूद इतर कोणत्याही बाबीसाठी वळवता येणार नाही.

<u>जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना पुर्नविनियोजन प्रस्ताव :-</u>

१) आदिवासी उपयोजनेअंतर्गत जिल्हास्तरीय योजनाकरिता मंजूर अर्थसंकल्पित तरतूदीनुसार जिल्हा नियोजन समितीच्या पूर्व मंजूरीने जिल्हाधिकारी पुर्नविनियोजन

प्रस्ताव विभागास दि.१५ फेब्रुवारीपर्यंत सादर करतील. दि.१५ फेब्रुवारी नंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. तद्नंतर होणारी बचत वळती करणेबाबतचे अंतिम अधिकार विभागाकडेच राहतील.

२) सोबत जोडलेल्या विहित विवरणपत्रात व बाब निहाय पुनर्विनियोजन प्रस्ताव सादर करण्यात यावा.तसेच सोबत कामांची यादी जोडण्यात यावी.

३) चालू आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीपैकी शिल्लक राहणाऱ्या बचतीस अनुसरुन पुनर्विनियोजन प्रस्ताव तयार करण्यात यावा.

४) जिल्हाधिकारी यांनी सादर केलेला पुनर्विनियोजन प्रस्ताव विभागाकडून मंजूर झाल्यानंतर निधी समर्पित करणे व पुनर्विनियोजन आदेश निर्गमित करण्यात येतील.

५) जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना पुनर्विनियोजन अर्थसंकल्पिय प्रणालीवर (बीडीएस) करण्याचे अधिकार विभागाकडेच राहतील.

वरील सुधारित कार्यपध्दतीचा अवलंब सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून लागू होणार असल्यामुळे सर्व जिल्हाधिकारी यांनी याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक क्रमांक २०१११२०५०५०५३२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( च. ज. देशपांडे )
उप सचिव

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
सर्व मा.अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,
मा.प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
मा.प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक

सर्व आयुक्त, आदिवासी विकास , ठाणे/ नाशिक/अमरावती /नागपूर

महालेखापाल (लेखापरिक्षा) (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र १-२ मुंबई/नागपूर (प्रत्येकी ५ प्रती)

विभागीय आयुक्त, मुंबई/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती/पुणे

सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन विकास समिती

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

उप संचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर/नंदूरबार/गडचिरोली

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई

संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन,मुंबई - ३२

ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन,मुंबई

सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२

निवडनस्ती (का.६)

## पुनर्विनियोजन विवरणपत्र

| जिल्ह्याचे नांव :- | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नियंत्रक अधिकारी : जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, ------- | | | | | | | (रुपय लाखात) | | |
| विकास क्षेत्र/उपविकास क्षेत्र/योजनेचे नांव | मागणी क्रमांक | मुख्य लेखाशिर्ष | टिएसपी/ ओटिएसपी | बाव क्रमांक | अर्थसंकल्पात तरतूद सन -- | जादा (+) | बचत (-) | पुनर्विनियोजना नंतरची अर्थसंकलपीय तरतूद सन | कारणे |
| गाभा क्षेत्र | | | | | | | | | |
| १) उपविकास क्षेत्र | | | | | | | | | |
| 1) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| 2) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| एकूण उपविकास क्षेत्र | | | | | | | | | |
| २) उपविकास क्षेत्र | | | | | | | | | |
| 1) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| 2) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| एकूण (टिएसपी) | | | | | | | | | |
| एकूण (ओटिएसपी) | | | | | | | | | |
| एकूण गाभा क्षेत्र | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| बिगर गाभा क्षेत्र | | | | | | | | | |
| १) उपविकास क्षेत्र | | | | | | | | | |
| 1) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| 2) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| एकूण उपविकास क्षेत्र | | | | | | | | | |
| २) उपविकास क्षेत्र | | | | | | | | | |
| 1) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| 2) योजनेचे नांव | | | | | | | | | |
| ३) उपविकास क्षेत्र | | | | | | | | | |
| ----- | | | | | | | | | |
| एकूण (टिएसपी) | | | | | | | | | |
| एकूण (ओटिएसपी) | | | | | | | | | |
| एकूण बिगर गाभा क्षेत्र | | | | | | | | | |
| एकूण एकंदर | | | | | | | | | |

----------